## FORM A
## PUBLIC ANNOUNCEMENT

(Regulation 14 of the Insolvency and Bankruptcy Board of India (Voluntary Liquidation Process) Regulations, 2017)

**FOR THE ATTENTION OF THE STAKEHOLDERS OF RATHI TURBOFLEX PRIVATE LIMITED**

| | | |
|---|---|---|
| 1 | Name of Corporate Person | **Rathi Turboflex Private Limited** |
| 2 | Date of incorporation of Corporate Person | 26/12/2002 |
| 3 | Authority under which corporate person is incorporated/ registered | Register of Companies – Pune |
| 4 | Corporate Identity Number (CIN) / limited liability identity number of Corporate Person | CIN: U31200PN2002PTC017536 |
| 5 | Address of the registered office and principal office (if any) of Corporate Person | Gaia Apex, S. R. No 33/1/1/2, Plot-DSecond Floor, Viman Nagar, Pune, Maharashtra, India, 411014. |
| 6 | Liquidation commencement date of Corporate Person | **25.03.2025** |
| 7 | Name, Address, Email address, Telephone number and the registration number of the liquidator | Name: Pramod Dattaram Rasam<br>Registration No.:IBBI/IPA-001/IP P00722/2017- 18/11259<br>Room No. 5, Shri Niwas Chawl, J B Nagar, Andheri - East Mumbai – 400059.<br>Phone: + 91 9820024763<br>Email : pdrasam@gmail.com |
| 8 | Last date for submission of claims | **24.04.2025** |

Notice is hereby given that the **Rathi Turboflex Private Limited** has commenced voluntary liquidation on 25.03.2025.

The stakeholders of **Rathi Turboflex Private Limited** are hereby called upon to submit a proof of their claims, on or before 24.04.2025, to the liquidator at the address mentioned against item 7.

The financial creditors shall submit their proof of claims by electronic means only. All other stakeholders may submit the proof of claims in person, by post or by electronic means.

Submission of false or misleading proofs of claim shall attract penalties.

Date: 26th March, 2025
Place: Pune

Sd/-
Pramod Dattaram Rasam
**Liquidator**
**IBBI Reg. No. IBBI/IPA-001/IP-P00722/2017-18/11259**

---

केनरा बैंक Canara Bank
सिंडिकेट Syndicate

## LATUR AUSA ROAD BRANCH (15247)

## POSSESSION NOTICE [SECTION 13(4)]

**Whereas :**

The undersigned being the Authorised Officer of the Canara Bank under Securitisation And Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 (Act 54 of 2002) (hereinafter referred to as "the Act") and in exercise of powers conferred under Section 13(12) read with Rule 3 of the Security Interest (Enforcement) Rules 2002, issued a Demand Notice dated **30/12/2024 and published on daily newspaper namely Business Standard & Dainik Punya Nagari** dated **17/01/2025** calling upon the **SMT. MEENAXI GANESH JOSHI and SHRI. GANESH PANDITRAO JOSHI (BORROWER)** to repay the amount mentioned in the notice, being **Rs.11,39,059.21/- (Rupees Eleven Lakhs Thirty-Nine Thousand Fifty-Nine and paise Twenty-One)** with interest thereon within 60 days from the date of receipt of the said notice.

The borrower having failed to repay the amount, notice is hereby given to the borrower and the public in general that the undersigned has taken possession of the property described herein below in exercise of powers conferred on him / her under section 13(4) of the said Act, read with Rule 8 & 9 of the said Rule on this **24th day of March of the year 2025.**

The borrower in particular and the public in general are hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property will be subject to the charge of Canara Bank for an amount of **Rs.11,39,059.21 - (Rupees Eleven Lakhs Thirty-Nine Thousand Fifty-Nine and paise Twenty-One)** and interest thereon.

The borrower's attention is invited to the provisions of Section 13(8) of the Act, in respect of time available, to redeem the secured assets.

**[Details of security assets]**

**IMMOVABLE :** FLAT NO. 203, ON FIRST FLOOR, SANKALP APARTMENT, ADM. SUPER BUILT UP AREA 81.75 SQ.MTR. ON PLOT NO.1 CORRESPONDING G.P. HOUSE NO.7256/1, GAT NO.122/1 NEAR FLYOVER LATUR BARSHI ROAD HARANGUL (BK) LATUR. TQ AND DIST LATUR 413531 **BOUNDED BY: EAST:** FLAT NO.2 **WEST:** PASSAGE AND FLAT NO.201 & 102 **NORTH:** FLAT NO.204 **SOUTH:** 70 FT ROAD ON GROUND FLOOR **NAME OF TITLE HOLDER : SMT. MEENAXI GANESH JOSHI & SHRI.GANESH PANDITRAO JOSHI**

DATE: 24/03/2025
PLACE : Latur

Seal of Bank

Sd/-
Authorised Officer, Canara Bank

---

IDBI BANK

IDBI Bank Ltd., Regional Office, Kolhapur & Goa Region, Matoshree Plaza, 455, E Ward, B-Wing, First Floor, Venus Corner,Station Road, Shahupuri, Kolhapur 416001. Website: **www.idbibank.in**

## Public Notice for Conversion of Chikhali (Prayag) Br., Kolhapur

The Bank has decided to convert the **Chikhali ( Prayag ) Branch** situated at Ramcharan Building, Main Road, Chikhali (Prayag), Tal. Karveer, Kolhapur – 416229 **into BC outlet with effect from 21st April, 2025**. Existing customers can avail the banking services from the fixed BC outlet opened at Mouje Chikhali, Tal. Karveer, District – Kolhapur – 416229. **For all enquiries, please contact IDBI Bank, Warange Branch, Waranage, Tal. Karveer, Dist. Kolhapur – 416229, Contact No.: 0231 - 2425770.** We assure best of our services from the new location as well. Inconvenience caused is regretted.

**KOLHAPUR.**
**Date: 26.03.2025.**

**Sd/-,**
**Chief General Manager, Pune Zone**

JPPL-25

---

## सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादीत, पुणे.

1102/10/11, मारणे हाईटस्, बुधवार पेठ, टिळक पुतळ्यासमोर, पुणे 411002
फोन नं, 020 24489400, 24489973, 9422004457, 9545513073

## प्रत्यक्ष ताबा नोटीस

ज्याअर्थी वसुली अधिकारी, सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित, पुणे यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा 1960 चे कलम 156 आणि महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम 1961 चे नियम क्र 101 चे अंतर्गत कर्जदार मे. बी. के. पेट्रोलियम प्रोप्रा शेख असलम बादशहा व त्यांचे जामीनदार यांचे विरूध्द उप निबंधक अधिकारी संस्था (परसेवा) पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोशिएशन पुणे 411009 यांचे कडून दावा क्रमांका 1107 / कलम / 101/2022–23 आणि 1108 / कलम / 1012022 / 23 दिनांक 15/09/2022 अन्वये वसुली दाखला प्राप्त केला त्याचे बजावणी कामी वरील कर्जदार व त्याचे जामीनदार यांची निम्नलिखित खालील मिळकत महाराष्ट्र सहकारी संस्था 1960 चे कलम 107 (10) नुसार जप्त केलेल्या मिळकतीच्या प्रत्यक्ष ताबा मिळणे कामी मा. जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे आदेशान्वये त्याचे अधिकृत मा.निवासी नायब तहसीलदार सो मुळशी, पुणे त्याचे नोटीस नुसार आज दिनांक 25/03/2025 रोजी मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा आम्हा पंचासमक्ष घेऊन तो वसुली अधिकारी सुवर्णयुग सहकारी बँक मर्या, पुणे यांना हस्तांतरीत केला असे सदर प्रत्यक्ष ताबा घेतल्या बाबतचा बोर्ड सुचना मिळकतीच्या दर्शनी भागात लावला आहे.

सबब बँकेनी प्रत्यक्ष ताबा मिळणेकामी प्रस्ताव दाखल करून त्या नुसार मा. जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हाधिकारीसाहेब, पुणे यांनी त्यांच्या आदेश क्र. को. ऑप / एस. आर / 367/ 2024, दिनांक 05/09/2024 नुसार निवासी नायब तहसिलदार, तथा कार्यकारी दंडाधिकारी मुळशी (पौड) पुणे यांनी वरील कर्जदार यांना जा. क्र. फौज / ताबा / एस.आर / 33 / 2024 दिनांक 24/02/2025 च्या आदेशान्वये मंगळवार दिनांक 25/03/2025 रोजी सकाळी 10.00 वाजता कर्जदार दार मे. बी. के. पेट्रोलियम प्रोप्रा शेख असलम बादशहा मौजे 1) 1) पुणे जिल्हा परिषद, पुणे पंचायत समिती मुळशी व कातरखडक ग्रामपंचायत हद्दीतील मौजे कातरखडक ता. मुळशी जिल्हा.पुणे येथील गट नं 53 एकूण क्षेत्र 0.46 आर पैकी क्षेत्र 11.50 आर. यासी आकार 0.07 पै . व गट नं 421 क्षेत्र 02 हे 21.00 आर यासी आकार 1.15 पै. आणि गट क्र . 422 एकूण क्षेत्र 03 हे 48 आर पैकी क्षेत्र 2 हे 61 आर यासी आकार 1.43 पै. श्री. शेख अस्लम बादशहा आणि श्री शेख अक्रम बादशहा यांचे खरेदी मालकी वहिवाटीचे / हिश्शाचे / वाटणीचे क्षेत्र यासह सर्व मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा जिल्हा दंडाधिकारी पुणे यांच्या आदेशान्वये प्राधिकृत केलेले अधिकारी निवासी नायब तहसिलदार मुळशी (पौड). पुणे यांनी आम्हा पंचासमक्ष घेतला असुन तो बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांना हस्तांतरीत केला असे. सदरचा प्रत्यक्ष ताबा घेतल्याबाबतचा बोर्ड सुचना मिळकतीच्या दर्शनी भागात लावला आहे.

### मिळकतीचे वर्णन

1) पुणे जिल्हा परिषद, पुणे पंचायत समिती मुळशी व कातरखडक ग्रामपंचायत हद्दीतील मौजे कातरखडक ता. मुळशी जिल्हा.पुणे.येथील गट नं 53 एकूण क्षेत्र 0.46 आर पैकी क्षेत्र 11.50 आर. यासी आकार 0.07 पै. व गट नं 421 क्षेत्र 02 हे 21.00 आर यासी आकार 1.15 पै. आणि गट क्र. 422 एकूण क्षेत्र 03 हे 48 आर पैकी क्षेत्र 2 हे 61 आर यासी आकार 1.43 पै. श्री. शेख अस्लम बादशहा आणि श्री शेख अक्रम बादशहा यांचे खरेदी मालकी वहिवाटीचे / हिश्शाचे / वाटणीचे क्षेत्र

**दिनांक – 25/03/2025**
**स्थळ – पुणे**

SEAL

Sd/-
**वसुली अधिकारी**
**सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित, पुणे.**

---

## OSMANABAD JANATA SAHAKARI BANK LTD OSMANABAD

Branch – WASHI

## AUCTION / PUBLIC NOTICE

SALE NOTICE OF IMMOVABLE PROPERTIES BY INVITING PUBLIC AUCTION UNDER RULES 8(6) & 9 OF THE SECURITY INTEREST ( ENFOCEMENT ) RULES 2002.Notice is hereby given to the effect that the immovable properties described herein, taken physical possession under the provisions of the Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of security Interest (Enfocement) Rules 2002, will be sold by Public Auction are sale of the under mentioned property on the following terms and conditions.

| Name Of Borrower / Mortgagor | Discription of Property | Reserved Price Rs. | Secured Debts total Outstanding with future Interest | Date, Time And Place of Auction |
|---|---|---|---|---|
| **Borrower**<br>**Sou. Aysha Manjur Pathan**<br>At. Post. Shivshakati Nagar, Washi, Tq. Washi Dist.Dharashiv.<br>**Guarantor**<br>**1. Shri. Nitin Khanderao Chede**<br>At.Post. Chede Galli, Washi, Tq.Washi Dist. Dharashiv.<br>**2. Shri. Sudhir Sampatrao Chede**<br>At.Post. Chede Galli, Washi, Tq.Washi Dist. Dharashiv | **1. Borrower :-** Aysha Manjur Pathan<br>At Washi Nagarpanchayat House No. 2631 Area 600 sq.ft.<br>**Bounded By -**<br>East : P.P. Chavan<br>West : Own House<br>South : Road<br>North : Baburao Ughade | **Rs. 6,40,083/-** | **Loan No. 131335100000470**<br>**Date 28.02.2025**<br>**Total Outstanding Rs. 25,92,700/-**<br>**With future Interest and Other Expenses.** | Date -28.04.2025<br>Time- 1.00 PM<br>Osmanabad Janata Sahakari Bank Ltd. Branch- WashiTq. Washi Dist.Dharashiv. |
| | **2.** At Washi Nagarpanchayat House No. 2631/1 Area 600 sq.ft.<br>**Bounded By -**<br>East : Own House<br>West : Road<br>South : Road<br>North : Baburao Ughade | **Rs. 4,37,583/** | | Date -28.04.2025<br>Time- 2.00 PM<br>Osmanabad Janata Sahakari Bank Ltd. Branch- WashiTq. Washi Dist.Dharashiv |

Terms & Conditions :- 1) The earnest money deposit is Rs.10,000/- ( In Words- Ten Thousand Only) to participate in the auction. 2) The aforesaid properties shall not be sold below the reserved price mentioned above. 3) The Successful bidder shall have to pay deposit 25% of the sale price immediately after the acceptance of the bid price by the Authorised Officer in respect to the sale and remaining 75% amount has to be paid within 15 days from the date acceptance of the bid failure to deposit the balance amount within prescribed period the amount deposited shall be forfeited. 4) Inspection of the above mentioned Secured Assets will be permitted at site to The intending person at 3.00 pm to 4.00 pm till the date of auction on working day Tuesday and Wednesday Only. 5) The Property Shown in the auction will be sold by public auction on "as is basis" 6) The authorised officer reserves has right to refuse, reject, cancel any of the offer made by the bidder without assigning any reasons.7)The buyer will be responsible for the tax, light bill and other taxes on the above property. 8) The property will be sold in " AS IS WHERE IS" conditions including encumbrances,if any,(There are no encumbrances to the knowledge of the bank.) 9) Sale shall be confirmed in favour of the successful bidder,subject to confirmation of the same by the secured creditor. 10) For further details Phone No.02478-276023 may be contacted during office hours on any working day.

**Date : 24/03/2025**
**Place : -Washi**

**Authorised Officer**
Osmanabad Janata Sahakari Bank Ltd. Osmanabad Branch-Washi.

---

Muthoot Homefin
**Muthoot Homefin (India) Ltd.**

**CIN - U65922KL2011PLC029231**
**Corporate Office : Muthoot Homefin (INDIA) Ltd. 19/E, The Ruby, Senapati Bapat Marg, Tulsi Pipe Road, Near Ruparel College, Dadar West, Mumbai - 400028.**
**Branch Office: Muthoot Homefin (India) Limited 6th floor, Building SC-1, Kohinoor Estate Co-Op Society, Old Mumbai - Pune Highway, Wakadewadi, Shivajinagar, Pune – 411003 Maharashtra**

**APPENDIX-IV-A [See proviso to Rule 8(6)]**

## PUBLIC NOTICE FOR PRIVATE TREATY CUM SALE

Pursuant to taking possession of the secured asset mentioned hereunder by the Authorized Officer of Muthoot Homefin (India) Ltd. under the Securitization and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 for the recovery of amount due from borrower/s, offers are invited by the undersigned in sealed covers for purchase of immovable property, as described hereunder, which is in the possession, on **'As Is Where Is Basis', 'As Is What Is Basis' and 'Whatever Is There Is Basis', Particulars of which are given below:-**

| Sr. No. | Borrower(s)/ Co-Borrower(s)/ Guarantor(s) / Loan Account No. / Branch | Demand Notice Date and Amount | Description of the Immovable property | Reserve Price | Earnest Money Deposit (EMD) (10% of RP) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Datta Mahadev Survashe/ Mayuri Datta Survase/ 003-00306852/ Pune | 25-Mar-2021/ Rs. 21,27,676/- Rupees Twenty One Lakh Twenty Seven Thousand Six Hundred Seventy Six Only. | Flat No 303 3rd Floor Arjun Paradises No 75/5/ 3/1 Raikar Mala Dhayari Gaon Pune Maharashtra-411041. More Particularly Mentioned In The Sale Deed Registered No. 16187- 2018 Dated- 11-Oct-18 In The Office Of Sub Registrar Haveli-XVI. Having Boundaries- North- Adjacent Road And Shivalay Heights, South- Open Plot, East- Arjun Prestige, West- Open Plot | Rs. 20,10,000/- Rupees Twenty Lakh Ten Thousand Only. | Rs. 2,01,000/- Rupees Two Lakh One Thousand Only. |

1. The Auction is being held on **"AS IS WHERE IS" AND "AS IS WHAT IS" basis**
2. The detailed terms and conditions of the auction sale are incorporated in the prescribed tender form, available at the above mentioned regional office
3. Last Date of Submission of Sealed Bid/Offer in the prescribed tender forms along with EMD payable by way of Demand Draft in Favor of 'Muthoot Homefin (India) Ltd'. along with KYC is on **16-Apr-2025 till 04:00 PM** at Regional Office the address mentioned herein above. Tenders that are not filled up completely or tenders received beyond last date will be considered as invalid tender and shall accordingly be rejected. No interest shall be paid on the EMD.
4. Date of Inspection of the Immovable Property is on **15-Apr-2025 between 01:00 P.M. to 03:00 P.M.**
5. Date of Opening of the Bid/Offer Auction Date for Property is **17-Apr-2025** at the above mentioned Branch Office address at **01:00 PM.** by the Authorised Officer.
6. The MHIL shall not be responsible for payment of any outstanding statutory notice & Encumbrances / taxes arrears etc. if any & their Responsible to pay the sum would be that of the Successful auction purchase. The Intending bidder should make their own independent inquiries regarding the Encumbrances Title of property & also inspect & satisfy themselves.
7. The Highest bidder shall be subject to approval of MHIL Ltd. Authorised Officer shall Reserve the right to accept all any of the offer /Bid so received without assign any reason whatsoever. His decision shall be final and binding.
8. The Borrower(s)/Guarantor(s) are hereby given 15 DAYS SALE NOTICE UNDER THE SARFAESI ACT, 2002 to pay the sum mentioned as above before the date of Auction failing which the immovable property will be auctioned and balance, if any, will be recovered with interest and costs. If the Borrower pays the amount due to Muthoot Homefin (India) Ltd, in full, before the date of sale, auction is liable to be set aside.

For further details, contact the Authorised Officer, at the above mentioned Office address Contact Person- **Pavan Tele-9420735873**

**Date : March 26, 2025**
**Place: Pune**

**Sd/- Authorized Officer,**
**Muthoot Homefin (India) Limited**

---

## ANGEL ONE LIMITED

**Regd. Off: 601, 6th Floor, ACKRUTI STAR, CENTRAL ROAD, MIDC, ANDHERI EAST, MUMBAI -400093**
**Centralized desk : 18001020 Email id : support@angelone.in**
**Member of : NSE / BSE / BSE REMISIER / MCX / MCX SX / NCDEX**
**Member IDs: NSE : 12798, BSE : 612, MCX : 12685,**
**NCDEX : 00220 SEBI Registration No: INZ000161534**

**NOTICE**

This is to inform all concerned that we have initiated the process of cancellation of registration of our below mentioned Authorised Person (AP) due to regulatory reasons/concerns.

| Name Of Authorised Person | Trade Name of AP | Address of AP | AP Registration No. |
|---|---|---|---|
| GOURINANDA MARUTRAO SHINDE | GOURINANDA MARUTRAO SHINDE | Malmatta No 91 Bamani Tal Khanapur Dist Sangli 416312 Maharashtra | **NSE : AP0397615591**<br>**BSE : AP01061201168165**<br>**MCX : MCX/AP/170311** |

Any person dealing with the above-mentioned Authorised Person henceforth shall do so at their own risk. **ANGEL ONE LTD.** shall not be liable for any dealings with the said entity post the issuance of this notice. Investors having any queries or concerns regarding this matter are requested to contact **ANGEL ONE LTD.** within **15 days** from the date of issuing this notice.

**Date : 26.03.2025**
**Place : Maharashtra**

**For ANGEL ONE LTD**
**Sd/-, Authorised Signatory**

---

नांदेड मर्चंटस् बँक
**Nanded Merchants Co-Operative Bank Ltd. Nanded**
ESTD. 1963
**Head Office: M.G Road, Old Mondha Nanded-431604 Ph 283431,283434**

## APPENDIX IV (See rule 8(1))
## POSSESSION NOTICE (For Immovable Property)

Whereas, The undersigned being the Authorised officer of **The Nanded Merchants co-operative Bank Ltd; Nanded** As decided by Board of Directors Meeting Held on Dt.10/04/2024 of **Deendayal Nagari Sahakari Bank Ltd, Ambejogai** Vide Resolution No. 19/01 and informed our bank vide letter Ref, No. Deendayal Bank/H.O/Recovery/67/2024/25 Dt. 16/04/2024 lead Bank has given recovery/Legal authority to the Authorised Officer of The Nanded Merchants co-operative Bank Ltd; Nanded it was approved by The Nanded Merchants co-operative Bank Ltd; Nanded vide Resolution No.8/1, Dt.29/04/2024 under the securitisation and reconstruction of financial Assets and enforcement of security interest (Second) ordinance, 2002 (Ord.3 of 2002) and in exercise of powers conferred under section 13(12) read with rule 9 of the security interest (Enforcement) rules.2002 issued demand notice **Date.10/05/2024** calling upon following borrower & Guarantor within 60 day s from the date of receipt of the said notice.

| Sr. No. | Borrower Name and Address | Name and Address of Guarantors for Four Loan accounts | Loan & Outstanding | Amount of (13/2)& Date | Possession Date |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Hotel New Aniket Prop.Phad Vidya Ashok. R/o Dharmapuri, Tq.Parli Vaijnath, Dist.Beed | 1) Phad Aniket Ashok . R/o Dharmapuri, Tq.Parli Vaijnath, Dist.Beed.<br>2) Phad Tushar Ashok. R/o Dharmapuri, Tq.Parli Vaijnath, Dist.Beed.<br>3) Phad Nilesh Ashok. R/o Dharmapuri, Tq.Parli Vaijnath, Dist.Beed.<br>4) Phad Kalpana Aniket. R/o Dharmapuri, Tq.Parli Vaijnath, Dist.Beed.<br>5) Phad Jyoti Tushar. R/o Dharmapuri, Tq.Parli Vaijnath, Dist.Beed.<br>6) Phad Swati Nilesh. R/o Dharmapuri, Tq.Parli Vaijnath, Dist.Beed.<br>7) Gite Asha Narsingrao. R/o Prashant Nagar, Ambejogai, Tq.Ambejigai, Dist.Beed. | **Term Loan**<br>Rs.1,26,00,000/- | 10/05/2024<br>**Rs.1,30,01,610/-** | 25/03/2025 |
| 2 | Aniket Petrolium Services Prop.Phad Vidya Ashok. R/o Dharmapuri, Tq.Parli Vaijnath, Dist.Beed | | **CCAgainst Hypothecation**<br>Rs.77,00,000/- | 10/05/2024<br>**Rs.80,31,882/-** | 25/03/2025 |
| 3 | Aniket Petrolium Services Prop.Phad Vidya Ashok. R/o Dharmapuri, Tq.Parli Vaijnath, Dist.Beed | | **Term Loan**<br>Rs.77,00,000/- | 10/05/2024<br>**Rs.79,48,349/-** | 25/03/2025 |
| 4 | Hotel Aniket Lodge and Restaurant Prop.Phad Vidya Ashok. R/o Dharmapuri, Tq.Parli Vaijnath, Dist.Beed | | **Term Loan**<br>Rs.3,85,00,000/- | 10/05/2024<br>**Rs.4,04,51,767/-** | 25/03/2025 |

Above named Borrower & Guarantor having failed to repay the amount, notice is hereby given to the borrower and the public in general under Consortium Agreement with Nanded Marchants Co-op Bank & Deendayal Nagari Sahakari Bank Ltd, Ambejogai the undersigned has taken possession of the property described here in below in exercise of powers conferred on her / him under section 13(4) of the said ordinance read with rule 9 of the said rule on this **25 March 2025.**

The borrower in particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property will be subject to the charge of the **The Nanded Merchants co-operative Bank Ltd; Nanded** Branch **Parbhani** & Deendayal Nagari Sahakari Bank Branch **Ambejogai** for an amount and interest thereon

Description of the Immovable Property mortgaged for above mentioned four loan accounts witch are in the Name of Borrower & Guarantor

**Property No.1**
**Property Owner Borrower Phad Vidya Ashok**

All that the piece and parcel of freehold land together with here ditaments and premises and the Hotel building together with petrol pump comprising of office, Restaurant, Lodging Rooms & Suits, Parking, Toilet and watchman cabin lying and being at plot of land bearing that N.A Plot of land bearing Gat No.1061adm O.H.81 R situated within the village limits Dharmapuri Taluka & Registration Sub - Taluka Parli (V) Dist. Beed Together with the building of Hotel Aniket Lodge and Restaurant and building and construction of Aniket Petroleum Services.

**Property No.2**
**Property Owner Gurantor Phad Aniket Ashok**

All that piece and parcel of freehold land together with hereditaments and premises situate, lying and being land bearing Gut No.1062 admg 1 H.49 R including N.A Plot admg 2500 Sq.Mtr. Together with the Tin shed hall, Kitchan, W.C Bath & toilets & Fabricated 14 Huts, Garden of Hotel Aniket situated Dharmapuri Taluka & Registration Sub-Taluka Parli (V) Dist.Beed.

**Property No.3**
**Property Owner Borrower Phad Vidya Ashok**

All that piece and parcel of Gram Panchayat H.No.288 Dharmapuri admg 78.07Sq.Mtr Together with the building construcated thereon situated within the village limits Dharmapuri Taluka & Registration Sub-Taluka Parli (V) Dist.Beed.

**Property No.4**
**Property Owner Borrower Phad Vidya Ashok**

All that piece and parcel of Open Plot Having Gram Panchayat H.No.1400 Dharmapuri admg 250.93 Sq.Mtr situated within the village limits Dharmapuri Taluka & Registration Sub-Taluka arli (V) Dist.Beed.

**Property No.5**
**Property Owner Borrower Phad Vidya Ashok**

All that piece and parcel of Commercil open Plot with construction there on having Gram Panchayat H.No.826 Dharmapuri admg 75.28 Sq.Mtr situated within the village limits Dharmapuri Taluka & Registration Sub-Taluka Parli (V) Dist.Beed.

Date :- 25/03/2025
Place :- Dharmapuri, Tq.Parli Vaijnath, Dist.Beed.

Signature
(Layak Nerlikar)
Authorised Officer
The Nanded Merchants Co-operative Bank Ltd; Nanded
Head Office: M.GRoad, Old Mondha Nanded

---

## NOTICE

DSP MUTUAL FUND

**NOTICE** is hereby given that DSP Trustee Private Limited, the Trustee to DSP Mutual Fund ('Fund') has approved the distribution under Income Distribution cum Capital Withdrawal ('IDCW') Option(s) of the below mentioned scheme(s) of the Fund.

**Record Date*: March 28, 2025**

| Name of Scheme(s) | Plan(s) | Option(s) | Quantum of IDCW (₹per Unit)# | Face Value (₹per Unit) | Latest available Net Asset Value ('NAV') as on March 24, 2024 (₹per unit) |
|---|---|---|---|---|---|
| DSP Gilt Fund | Regular | IDCW | 0.289000 | 10.00 | 12.5064 |
| DSP Gilt Fund | Direct | IDCW | 0.326100 | 10.00 | 12.6505 |
| DSP Savings Fund | Regular | IDCW | 0.408500 | 10.00 | 12.5645 |
| DSP Savings Fund | Direct | IDCW | 0.423900 | 10.00 | 12.6107 |
| DSP Regular Savings Fund | Regular | Quarterly IDCW | 0.239490 | 10.00 | 11.9745 |
| DSP Regular Savings Fund | Direct | Quarterly IDCW | 0.239490 | 10.00 | 14.3692 |
| DSP Short Term Fund | Regular | IDCW | 0.888000 | 10.00 | 12.8318 |
| DSP Short Term Fund | Direct | IDCW | 0.960500 | 10.00 | 12.8564 |
| DSP Bond Fund | Regular | IDCW | 0.877200 | 10.00 | 12.1384 |
| DSP Bond Fund | Direct | IDCW | 0.927700 | 10.00 | 12.2937 |
| DSP Ultra Short Fund | Regular | IDCW | 19.689200 | 1000.00 | 1128.3826 |
| DSP Ultra Short Fund | Direct | IDCW | 21.754100 | 1000.00 | 1141.1058 |
| DSP Credit Risk Fund | Regular | IDCW | 2.449600 | 10.00 | 13.9992 |
| DSP Credit Risk Fund | Regular | Quarterly IDCW | 1.351700 | 10.00 | 12.5971 |
| DSP Credit Risk Fund | Direct | IDCW | 2.564900 | 10.00 | 14.1612 |
| DSP Credit Risk Fund | Direct | Quarterly IDCW | 1.385000 | 10.00 | 12.7442 |
| DSP Banking & PSU Debt Fund | Regular | IDCW | 0.783500 | 10.00 | 11.0079 |
| DSP Banking & PSU Debt Fund | Regular | Quarterly IDCW | 0.167300 | 10.00 | 10.4026 |
| DSP Banking & PSU Debt Fund | Direct | IDCW | 0.815000 | 10.00 | 11.0410 |
| DSP Banking & PSU Debt Fund | Direct | Quarterly IDCW | 0.176900 | 10.00 | 10.4166 |
| DSP 10Y G-Sec Fund | Regular | IDCW | 0.947600 | 10.00 | 11.2831 |
| DSP 10Y G-Sec Fund | Regular | Quarterly IDCW | 0.264800 | 10.00 | 11.1025 |
| DSP 10Y G-Sec Fund | Direct | IDCW | 0.977200 | 10.00 | 11.5073 |
| DSP 10Y G-Sec Fund | Direct | Quarterly IDCW | 0.268500 | 10.00 | 11.0493 |
| DSP Low Duration Fund | Regular | Quarterly IDCW | 0.183600 | 10.00 | 10.9073 |
| DSP Low Duration Fund | Direct | Quarterly IDCW | 0.191500 | 10.00 | 10.9450 |
| DSP Strategic Bond Fund | Regular | IDCW | 103.508800 | 1000.00 | 1326.3696 |
| DSP Corporate Bond Fund | Direct | IDCW | 0.854700 | 10.00 | 12.0273 |
| DSP Corporate Bond Fund | Direct | Quarterly IDCW | 0.203100 | 10.00 | 11.4262 |
| DSP Corporate Bond Fund | Regular | IDCW | 0.823100 | 10.00 | 11.9753 |
| DSP Corporate Bond Fund | Regular | Quarterly IDCW | 0.185100 | 10.00 | 10.7712 |
| DSP Equity Savings Fund | Regular | Quarterly IDCW | 0.210000 | 10.00 | 14.085 |
| DSP Equity Savings Fund | Direct | Quarterly IDCW | 0.210000 | 10.00 | 17.407 |
| DSP Aggressive Hybrid Fund | Regular | IDCW | 0.200000 | 10.00 | 29.464 |
| DSP Aggressive Hybrid Fund | Direct | IDCW | 0.200000 | 10.00 | 71.272 |

#The per unit rate is same for individual and other category of investors. *If in case the Record Date falls on a non-Business Day, the immediately following Business Day shall be the Record Date except for DSP Credit Risk Fund, DSP Regular Savings Fund and DSP Corporate Bond Fund, the record date shall be immediately preceding Business Day as prescribed in the respective Scheme Information Document. Distribution of the above IDCW is subject to the availability and adequacy of distributable surplus.

**Pursuant to payment of IDCW, the NAV of the IDCW Option(s) of the aforesaid Scheme(s) of the Fund would fall to the extent of payout and statutory levy, if any.** IDCW amount will be paid to all those Unit Holders/Beneficial Owners whose names appear in the records of the Registrar and Transfer Agent, Computer Age Management Services Limited/statement of Beneficiary Owners maintained by the Depositories under the IDCW Option(s) of the aforesaid Scheme(s) as on the Record Date. The Payout shall be subject to tax deducted at source (TDS) as applicable.

Unit holders are advised to update change of address / bank details, if any, with depository participant(s) in advance of the Record Date.

Any queries/clarifications in this regard may be addressed to: **DSP ASSET MANAGERS PRIVATE LIMITED** CIN: U65990MH2021PTC362316, Investment Manager for DSP Mutual Fund ('Fund'), Mafatlal Centre, 10th Floor, Nariman Point, Mumbai 400021, Tel. No.: 91-22-66578000, Fax No.: 91-22 66578181, Toll Free No: 1800 200 4499 Website: www.dspim.com

Unit holders are requested to update their PAN, KYC, email address, mobile number, nominee details with AMC and are also advised to link their PAN with Aadhaar Number. Further, Unit holders can view the Investor Charter available on website of the Fund as well as check for any unclaimed redemptions or Income Distribution cum Capital Withdrawal ('IDCW') payments.

Place: Mumbai
Date: March 25, 2025

**Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.**

# विवाहाच्या दोन आठवड्यांतच पतीचा काटा काढला!

**मैनपुरी (उत्तर प्रदेश) :** उत्तर प्रदेशच्या मैनपुरी जिल्ह्यात एक थरारक हत्या उघडकीस आली आहे. येथे एका महिलेने आपल्या प्रियकरासोबत कट रचत अवघ्या दोन आठवड्यांपूर्वी झालेल्या पतीची हत्या घडवून आणली. प्रगती यादव हिचे गेल्या चार वर्षांपासून गावातील अनुराग यादवसोबत प्रेमसंबंध होते. मात्र, कुटुंबाने तिचे लग्न ५ मार्च २०२५ रोजी २२ वर्षीय दिलीप यादवसोबत लावून दिले. या विवाहामुळे नाराज असलेल्या प्रगतीने अनुरागसोबत मिळून दिलीपची हत्या करण्याचा कट रचला. दिलीप श्रीमंत असून त्याच्या मृत्यूनंतर ते दोघे सुखी जीवन जगू शकतात. त्यामुळे तिने अनुरागला १ लाख रुपये दिले आणि त्याने सुपारी किलर रामजी नगर याला २ लाखांत हत्या करण्यासाठी तयार केले.

## संक्षिप्त

### धावत्या रेल्वेत टीटीईकडून विनयभंगाचा प्रयत्न

**मनमाड :** गोरखपूर-बंगळूर विशेष रेल्वेत प्रवास करणाऱ्या एका २२ वर्षीय युवतीचा विनयभंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तिकीट परीक्षकाला (टीटीई) पोलिसांनी अटक केली आहे. भुसावळ-मनमाडदरम्यान घडली. रेल्वे सुरू असताना या प्रकाराने भेदरलेल्या युवतीने प्रसंगावधान राखत स्वत:ला डब्यातील शौचालयात कोंडून घेत अतिप्रसंग टाळला. यादरम्यान, रेल्वे पोलिस कंट्रोल रूमशी संपर्क साधत मदत मिळवली. त्यावर यंत्रणा सक्रिय होऊन संशयित टीटीई तिवारी याला अटक करण्यात आली. रेल्वे पोलिसांनी माहितीनुसार, २२ वर्षांची युवती कानपूरहून पुण्याला प्रवास करत होती. तिच्याकडे आरएसी तिकीट होते. तिने संशयित, तिवारी नामक टीटीईकडे सीट उपलब्धतेबाबत विचारणा केली असता, त्याने तिला ए- १ कोचमध्ये सीट दिली. काही वेळाने तो तिच्याजवळ आला व तिच्याशी गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केला. प्रथम तिला हे अनवधानाने झाले असावे, असे वाटले; परंतु त्याने पुन्हा तीच कृती केल्याने ती घाबरली व शौचालयात जाऊन लपली. तेथून वडिलांना भ्रमणध्वनीवरून माहिती दिली.

### शिक्षकाकडून १५ विद्यार्थिनींचा विनयभंग

**मडगाव :** बाल संरक्षण कायदा, पोस्को आणि जुवीनाईल जस्टीससारखे प्रभावी कायदे अस्तित्वात असताना देखील गोव्यात शिक्षकांकडून विद्यार्थ्यांचे शोषण करण्याचे प्रकार घडत आहेत. कोलवाळ येथे नऊ वर्षीय विद्यार्थ्याला शिक्षिकांकडून जबर मारहाण तसेच कुडचडेत दंगामस्ती करणाऱ्या नववीतील विद्यार्थ्याला शिक्षकाने बेदम मारहाण केल्याच्या घटनांमुळे संतापाचे वातावरण असतानाच केपे तालुक्यातील एका अनुदान प्राप्त शाळेतील शिक्षकाने अभ्यास दौऱ्यावर गेलेल्या १५ विद्यार्थिनींचा विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. हे प्रकरण अंगलट येणार या भीतीने त्या शिक्षकाला स्वेच्छानिवृत्ती देऊन शाळा व्यवस्थापनाने स्वत:चा बचाव करण्याचा प्रयत्न केला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सहा महिन्यांपूर्वीची ही घटना नुकतीच समोर आली असून सदर शिक्षकाचे अनेक प्रताप यापूर्वीही गाजले होते.

### अमेरिकेतून बेपत्ता भारतीय तरुणाचा मृतदेह आढळला

**ह्यूस्टन :** अमेरिकेच्या टेक्सास राज्यातील प्रिन्स्टन येथे ३० वर्षीय भारतीय तरुण अभिषेक कोल्ली यांचा मृतदेह सापडला. स्थानिक अधिकाऱ्यांच्या मते, हे प्रकरण आत्महत्येचे असू शकते, परंतु तपास अद्याप सुरू आहे. आंध्र प्रदेशच्या कृष्णा जिल्ह्यातील गुडीवाडा येथील रहिवासी असलेले अभिषेक कोल्ली शनिवारी बेपत्ता झाले होते. त्यांच्या शोधासाठी पोलिस आणि स्थानिक समुदायाने संयुक्त मोहीम राबवली. त्यांचा मृतदेह दुसऱ्या दिवशी सापडला. अभिषेक कोल्ली गेल्या सहा महिन्यांपासून बेरोजगार होते आणि आर्थिक संकटाचा सामना करत होते, अशी माहिती त्यांचा जुळा भाऊ अरविंद कोल्ली यांनी दिली. त्यांच्या अंत्यसंस्काराचा खर्च आणि पार्थिव भारतात नेण्यासाठी अरविंद यांनी मोहिम सुरू केली, ज्याने अवघ्या २४ तासांत ५९,००० डॉलर्सपेक्षा अधिक निधी जमा केला आहे.

### बांगलात पुन्हा सत्ताबदलाची अफवा

**ढाका :** आठ महिन्यांपूर्वी सत्ताबदल झालेल्या बांगला देशमधील राजकीय हालचाली पुन्हा एकदा वेगावल्या आहेत. बांगला देशचे लष्करप्रमुख वकार उझ जमान यांनी उच्च लष्करी अधिकाऱ्यांसोबत आपत्कालीन बैठक घेतल्याचीही चर्चा होती; मात्र लष्करप्रमुखांनी सरकारविरोधी उठावाशी संबंधित अफवा फेटाळली आहे. 'ढाका ट्रिब्यून'च्या वृत्तानुसार, लष्करप्रमुख जमान यांनी देशात आणीबाणी लागू करणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच जनतेला संयम राखण्याचे आवाहन केले.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी नागपूर दौऱ्यावर



**नागपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी गुढीपाडव्याला रविवारी (३० मार्च) नागपूरच्या दौऱ्यावर येणार आहेत. नागपूर विमानतळावर दाखल झाल्यानंतर ते रेशीमबाग येथील डॉ. हेडगेवार स्मृती भवन, त्यानंतर दीक्षाभूमी भेट देणार आहेत. तसेच माधव नेत्रालय येथे जाणार आहेत. पंतप्रधान मोदींच्या नियोजित दौऱ्याच्या अनुषंगाने नागपूर पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी दौऱ्यातील संपूर्ण मार्गाची पाहणी केली. या संपूर्ण मार्गावर भेट देऊन महापालिका व पोलिस प्रशासनाद्वारे पाहणी करण्यात आली. आवश्यक ते निर्देश देण्यात आले.

# केनडी यांच्या हत्येचे गूढ उलगडणार?

## ट्रम्प यांच्याकडून दस्तावेज सार्वजनिक; सीआयए संशयाच्या भोवऱ्यात

**अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनडी यांच्या हत्येचा उलगडा होण्याची शक्यता आहे. कारण, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केनडी यांच्या हत्येचे गोपनीय दस्तावेज सार्वजनिक केले आहेत. सीआयए या गुप्तचर संस्थेतील एका गटानेच केनडी यांची हत्या घडवून आणल्याचा संशय या दस्तावेजामधून व्यक्त करण्यात आला आहे.**

**पूर्वपिठिका :** अमेरिकेचे ३५वे राष्ट्राध्यक्ष केनडी यांची ६२ वर्षांपूर्वी २२ नोव्हेंबर १९६३ रोजी टेक्सास येथे गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. केनडी खुल्या कारमध्ये बसून प्रचार रॅलीला जात असताना एका इमारतीच्या खिडकीतून त्यांच्यावर तीन गोळ्या झाडण्यात आल्या. दोन गोळ्या त्यांच्या डोक्यात, तर एक त्यांच्या गळ्यात लागली. त्यांच्या पत्नी जॅकलीन केनडी यांच्या मांडीवरच त्यांनी जीव सोडला होता.



### माजी उच्चपदस्थाचा दावा

या हत्येनंतर माजी इंटेलिजन्स एजंट जे. गॅरेट अंडरहिल यांनी दावा केला होता की, सीआयएमधील एका गटाने केनडी यांच्या हत्येची कटकारस्थान रचली होती. आपणासही हे लोक मला मारून टाकतील. त्याच्या या विधानानंतर अवघ्या ६ महिन्यांत अंडरहिलचा मृतदेह आढळून आला होता.



### हल्ला कसा झाला?

१९६४ मधील अध्यक्षीय निवडणुकीच्या तयारीसाठी केनडी डॅलस शहरात प्रचार दौऱ्यावर होते. खुल्या छताच्या लिमोझिन कारमध्ये ते जनतेशी संवाद साधत असताना त्यांच्यावर गोळीबार झाला. घटनास्थळी उपस्थित हजारो लोक हादरले.

### सत्याचा उलगडा होण्याची शक्यता कमीच

६२ वर्षांनंतरही केनडी यांच्या हत्येचे गूढ कायम आहे. कोण यात सामील होते, यावर आजही चर्चा सुरू आहे. दस्तावेज सीआयएवर संशय अधिकच बळकट करतात; मात्र केनडी हत्या प्रकरणाच्या पूर्ण सत्याचा उलगडा होण्याची शक्यता अजूनही धूसर आहे.

**८० मीटर अंतरावरून गोळ्या घातल्या**




### ८० हजार गोपनीय कागदपत्रे

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १८ ते २० मार्चदरम्यान ८०,००० हून अधिक गोपनीय दस्तावेज सार्वजनिक केले. या दस्तावेजांमध्ये पुढील गोष्टी उघड झाल्या आहेत. सीआयए या गुप्तचर यंत्रणेअंतर्गत एका गटाने केनडी यांच्या हत्येची योजना आखली होती. सीआयएने फिडेल कॅस्ट्रो यांना संपवण्यासाठी ६ प्रयत्न केले होते आणि याच कारणामुळे केनडी यांची हत्या घडवून आणली गेली असावी. सीआयएच्या अधिकाऱ्यांचा संबंध शस्त्र व ड्रग्ज तस्करीशी होता.

### हत्येतील प्रमुख थिअरी

- रशियन गुप्तचर संस्था केजीबीवर संशय
- हल्लेखोर हा कधी काळी सोव्हिएत युनियनमध्ये राहिला होता.
- हत्येच्या दोन महिन्यांपूर्वी तो केजीबीच्या अधिकाऱ्यांना भेटला होता.
- केनडी यांच्या धोरणांमुळे क्युबातील गुन्हेगारांचे धाबे दणाणले होते.
- यातूनच अमेरिकन आणि क्युबन माफियांनी त्यांना मारण्यासाठी कट रचला असावा.

### आरोपी आणि त्याचा मृत्यू

ली. हार्वी ओसवाल्ड या २४ वर्षीय हल्लेखोरास केनडी यांच्या हत्येप्रकरणी अटक करण्यात आली होती. अटक केल्यानंतर अवघ्या २ दिवसांत जॅक रूबी नावाच्या एका नाईट क्लब मालकाने त्याची हत्या केली. ही घटना थेट टेलिव्हिजनवर प्रसारित झाली होती. रुबी याने केनडी यांच्यावरील प्रेमापोटी हल्लेखोराची हत्या केल्याचा दावा केला होता. तथापि, त्याच्यावर कुणी विश्वास ठेवला नाही.

# जागतिक अस्थैर्यातही भारतीय अर्थव्यवस्था शाश्वत

## आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा अहवाल; २०१७ पासून देशाचा झपाट्याने विकास

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची आर्थिक प्रणाली वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेमुळे अधिक मजबूत आणि आव्हानात्मक बनली असल्याचे प्रशस्तीपत्र आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) दिले आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक यांच्या संयुक्त वित्तीय क्षेत्र मूल्यांकन कार्यक्रमअंतर्गत भारताच्या वित्तीय क्षेत्राचे सखोल विश्लेषण करण्यात आले. यामध्ये म्हटले आहे की, आंतरराष्ट्रीय स्तरावरील जागतिक अस्थैर्याच्या काळामध्येही भारतीय अर्थव्यवस्थेचा वेग झेपावत आहे. कोव्हिड सारख्या महामारीच्या संकटामध्येही भारतीय अर्थव्यवस्थेने उभारी घेतली आहे. २०१७ पासूनच भारताच्या अर्थव्यवस्थेने भरारी घेण्यास सुरुवात केली आहे. तत्पूर्वी, २०१० च्या दशकातील आर्थिक संकटांमधून सावरत भारताने आर्थिक क्षेत्रात मोठी सुधारणा केली आहे. वित्तीय व्यवस्था अधिक विविध आणि एकमेकांशी जोडली गेली आहे. बिगर-बँकिंग वित्तीय संस्था आणि भांडवली बाजारातून मिळणाऱ्या वित्तपुरवठ्यात मोठी वाढ झाली आहे.

### भारताच्या धोरणांचे कौतुक

भारत सरकारच्या खंबीर धोरणामुळे सर्वसमावेशक विकास सुरू आहे. बँकिंगसह अन्य विमा क्षेत्रातही आमूलाग्र बदल करण्यात आला आहे. भारतातील नियामक आणि प्राधिकरणांच्या दीर्घकालीन सुधारणा योजनांच्या दिशेनेच आहेत. त्यामुळे या शिफारशींची अंमलबजावणी आर्थिक व्यवस्थेच्या बळकटीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# भारताकडून निवडणुकीत हस्तक्षेप होण्याची शक्यता

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

**कॅनडाचा कांगावा; परराष्ट्र मंत्रालयाने आरोप फेटाळले**

आपल्या भूमीवर सक्रिय असलेल्या भारतविरोधी आणि खलिस्तानी समर्थकांना प्रोत्साहन देत असणाऱ्या कॅनडाने पुन्हा एकदा भारतावर गंभीर आरोप केला आहे. भारत आणि चीन २८ एप्रिल रोजी कॅनडामध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करू शकतात, असा कांगावा कॅनडाने केला आहे. यापूर्वीही कॅनडाने असेच आरोप केले होते, जे भारताने पूर्णपणे फेटाळून लावले आहेत.

इटलीचे नवनियुक्त पंतप्रधान मार्क कार्नी यांनी २८ एप्रिल रोजी मुदतपूर्व निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला आहे. 'रॉयटर्स'ने दिलेल्या वृत्तानुसार, कॅनडाच्या गुप्तचर संस्थेने सोमवारी दावा केला की, भारत आणि चीन आगामी कॅनडाच्या सार्वत्रिक निवडणुकीत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करू शकतात.

# एनजेएसी कायद्याच्या फेरविचाराची योग्य वेळ

## उपराष्ट्रपती : सर्वपक्षीय नेत्यांच्या बैठकीत न्यायपालिकेच्या जबाबदारीवर विचारमंथन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग कायदा (एनजेएसी) हा संसदेत अभूतपूर्व एकजुटीने मंजूर करण्यात आला होता आणि आवश्यक राज्य विधिमंडळांनी त्याला मान्यता दिली होती. आता हा कायदा पुन्हा विचारात घेण्याची योग्य वेळ आहे, असे मत उपराष्ट्रपती जगदिश धनकड यांनी व्यक्त केले.

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी सापडलेल्या कथित बेहिशोबी रोख रकमेबाबत सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी संसदेतील विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत न्यायपालिका जबाबदारी आणि या प्रकरणाशी संबंधित इतर मुद्द्यांवर चर्चा झाली. मात्र, यातून ठोस निश्कर्ष निघू शकला नाही.

विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी न्यायव्यवस्थेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांचे प्रतिनिधित्व, पारदर्शक गुणवत्ता-आधारित नियुक्ती प्रणालीचा अभाव आणि 'अंकल जज' सिंड्रोम यासारख्या मुद्यांवर चिंता व्यक्त केली.

शिवसेना (ठाकरे) खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी पत्रकारांना सांगितले की, आजच्या बैठकीत कोणताही निर्णय झाला नाही. हा मुद्दा पुढील आठवड्यात सभागृहात चर्चा होण्याची शक्यता आहे. तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनीही या प्रकरणावर संसदेत चर्चा करण्याची मागणी केली.

### न्यायपालिका आणि संसदीय सार्वभौमत्वाचा प्रश्न

धनखड यांनी स्पष्ट केले की, निष्पक्ष चौकशी होईपर्यंत कोणीही दोषी ठरवले जाऊ नये. मात्र, हा वाद फक्त न्यायव्यवस्थेच्या गोंधळापुरता मर्यादित नाही. तो संसदेच्या सार्वभौमत्वाशी आणि तिच्या श्रेष्ठत्वाशी देखील संबंधित आहे. न्यायपालिका आणि संसद यांच्यात समतोल राहणे आवश्यक आहे. संसदेच्या सार्वभौमत्वाच्या मुद्यावर भर देत त्यांनी खासदारांना या महत्त्वाच्या विषयावर विचार करण्याचे आवाहन केले आणि भविष्यात संसदेत यावर अधिक चर्चा होईल, असेही सांगितले.

**कायदा पुनरुज्जीवित करण्यावर भर**

भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी तीन न्यायाधीशांचे समिती गठित करून न्यायमूर्ती वर्मा यांच्या निवासस्थानी जप्त झालेल्या रोख रकमेसंबंधी चौकशी सुरू केली आहे. सरकार या अहवालाची वाट पाहत असून, न्यायपालिका जबाबदारी आणि राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग कायदा पुनरुज्जीवित करण्याच्या शक्यतेवर सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. २०१५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने हा कायदा घटनाबाह्य ठरवला होता.

राज्यसभा अध्यक्ष धनखड यांनी सांगितले की, एनजेएसी कायदा हा संसदेत अभूतपूर्व एकजुटीने मंजूर करण्यात आला होता आणि आवश्यक राज्य विधिमंडळांनी त्याला मान्यता दिली होती. आता हा कायदा पुन्हा विचारात घेण्याची योग्य वेळ आहे. जर एनजेएसी अस्तित्वात असता, तर परिस्थिती वेगळी असती, असेही धनखड म्हणाले.

# अभिनेत्री रण्या रावचे हवाला रॅकेटशी संबंध

**नवी दिल्ली :** अभिनेत्री रण्या राव हिने तिचे हवाला रॅकेटशी संबंध असल्याची माहिती महसूल गुप्तचरने न्यायालयात दिली. दरम्यान, मंगळवारी विशेष न्यायालयाने रण्या राव यांच्या सोने तस्करी प्रकरणातील जामीन अर्जावर २७ मार्चपर्यंत आदेश राखून ठेवला. सुनावणीदरम्यान, राव यांच्या वतीने त्यांच्या वकिल किरण जवळी यांनी जामिनासाठी युक्तिवाद केला, तर महसूल गुप्तचर संचालनालय (डीआरआय) चे वकील मधु राव यांनी तिच्या बेकायदेशीर आर्थिक हस्तांतरणातील थेट सहभागाचे पुरावे सादर केले. अभिनेत्रीने सोने खरेदीसाठी हवाला मार्गांचा वापर केल्याची कबुली दिली आहे.


# एस.एस. मोबाईलकडून गुढीपाडव्यानिमित्त '१ पे ४' ऑफर

**कोल्हापूर :** महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक आणि मध्य प्रदेशातील ४०० हून अधिक स्टोअर्स असलेल्या एस.एस. मोबाईलतर्फे गुढीपाडव्यानिमित्त 'गुढीपाडवा बिग सेल' जाहीर करण्यात आला आहे. या सेलमध्ये ग्राहकांसाठी '१ पे ४' आकर्षक ऑफर्स उपलब्ध असून, प्रत्येक स्मार्टफोन खरेदीवर दोन वर्षांची वॉरंटी, हमखास गिफ्ट, कॅशबॅक आणि भरघोस डिस्काऊंट देण्यात येणार आहे. ही ऑफर २६ मार्च ते ३१ मार्चदरम्यान लागू उपलब्ध आहे.

या सेलमध्ये प्रीमियम स्मार्टफोन्स अविश्वसनीय किमतीत उपलब्ध असून, आयफोन, सॅमसंग आणि गुगल पिक्सेल यांसारखे फोन कमी हप्त्यांमध्ये खरेदी करण्याची संधी मिळणार आहे. एआय तंत्रज्ञानयुक्त ओप्पो, मोटारोला आणि विवोचे स्मार्टफोन्स विशेष सवलतीत उपलब्ध असतील. तसेच ५जी स्मार्टफोन्स आणि बजेट स्मार्टफोन्सदेखील आकर्षक दरात मिळणार आहेत. स्मार्ट




वॉच, एअरबडस्, पॉवर बँक आणि इतर ॲक्सेसरीजवर ७५ टक्केपर्यंत सूट देण्यात येणार आहे. याशिवाय स्मार्ट टीव्ही खरेदी करणाऱ्या ग्राहकांना एक स्मार्टफोन मोफत मिळणार आहे. या ऑफरचा लाभ सर्व प्रमुख फायनान्स कंपन्या आणि बँकांच्या ईएमआय व कॅशबॅक सुविधांसह घेता येणार आहे. ग्राहकांनी या अनोख्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन एस.एस. मोबाईलतर्फे करण्यात आले आहे.


# देशभरातील ३२ लाख मुस्लिमांना 'सौगात-ए-मोदी'

**नवी दिल्ली :** भाजप अल्पसंख्याक मोर्चा ईदच्या आधी देशभरातील ३२ लाख वंचित मुस्लिमांना मदत करण्यासाठी 'सौगात-ए-मोदी' नावाने विशेष किट वाटप करणार आहे.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या मार्गदर्शनात मंगळवारी दिल्लीतील निजामुद्दीन येथून या उपक्रमाची सुरूवात करण्यात आली. गरीब मुस्लिम कुटुंबांना कोणत्याही अडचणीशिवाय ईद साजरी करता यावी, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या प्रयत्नाचा एक भाग म्हणून भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे ३२ हजार कार्यकर्ते देशभरातील ३२ हजार मशिदींच्या सहयोगाने गरजू लोकांपर्यंत पोहोचतील आणि त्यांना मदत करणार आहेत. प्रत्येक किटची किंमत साधारण ५०० ते ६०० रुपये असणार आहे. सौगात-ए-मोदी मोहिमेअंतर्गत वाटण्यात येणाऱ्या किटमध्ये खाद्यपदार्थांसोबतच, किटमध्ये कपडे, शेवया, खजूर, सुकामेवा आणि साखर यांचा समावेश असेल. कपडेही या किटमध्ये असणार आहेत.

# व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर २५ टक्के कर



**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हेनेझुएला येथून तेल आणि गॅस खरेदी करणाऱ्या देशांवर २५ टक्के अतिरिक्त कर लावण्याची घोषणा केली आहे. हे शुल्क २ एप्रिलपासून लागू होईल. ट्रम्प यांच्या मते, याचा उद्देश व्हेनेझुएलाला शिक्षा करणे आहे. ट्रम्प म्हणाले की, व्हेनेझुएला जाणूनबुजून आणि कपटाने गुन्हेगार आणि हिंसक टोळी सदस्यांना अमेरिकेत पाठवते, ज्यात ट्रेन डी अरागुआसारख्या दहशतवादी संघटनांचा समावेश आहे. आम्ही या गुन्हेगारांना परत पाठवू. अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या या निर्णयामुळे रिलायन्ससारख्या काही भारतीय कंपन्यांच्या अडचणी वाढू शकतात. रिलायन्स भारताच्या आयातीपैकी जवळपास ९० टक्के तेल व्हेनेझएलामधून खरेदी करते.

# उसळीनंतर निर्देशांकाला ओहोटी; सेन्सेक्स, निफ्टीत किरकोळ वाढ

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

सलग सातव्या सत्रात भारतीय शेअर निर्देशांकात वाढ नोंदविण्यात आली. मंगळवारच्या सत्रात शेअर निर्देशांकाने उसळी घेतल्यानंतर नफा कमावण्यासाठी शेअर विक्री वाढल्याने निर्देशांक किरकोळ वाढीवर बंद झाला. सेन्सेक्स ३२ आणि निफ्टी निर्देशांकात १० अंकांनी वाढ झाली.

मुंबई शेअर बाजारात (बीएसई) सेन्सेक्सने सकाळच्या सत्रात सातशे अंकांहून अधिक उसळी घेत ७८ हजार ७४१ अंकांवर झेप घेतली. आयटी कंपन्यांच्या शेअरमध्ये वाढ झाल्याने सेन्सेक्सला बळ मिळाले. मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकात घट झाल्याने सेन्सेक्स खाली आला. बाजार बंद होताना सेन्सेक्स किरकोळ वाढीसह ७८ हजार १७ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजारात (एनएसई) निफ्टी निर्देशांकाने दोनशे अंकांहून अधिक वाढ नोंदवत २३,८६९ अंकांवर भरारी घेतली. बाजार बंद होताना किरकोळ वाढीसह निफ्टी २३,६६८ अंकांवर स्थिरावला.

**रुपयाची वाढ थांबली**

गेल्या नऊ सत्रांत सातत्याने वधारणाऱ्या रुपयाची वाढ मंगळवारच्या सत्रात रोखली गेली. आयातदारांकडून डॉलरची मागणी वाढल्याने रुपया १२ पैशांनी कमकुवत झाला. एका डॉलरचा भाव ८५.७५ रुपयांवर बंद झाला. सोमवारच्या सत्रात रुपया ८५.४९ पर्यंत बळकट झाला. बाजार बंद होताना डॉलरचा भाव ८५.६३ वर बंद झाला होता.

| सोने (प्रति १० ग्रॅम) | |
| --- | --- |
| शुद्ध | ८९,२९०/- |
| चांदी | १,०१,०००/- किलो |



| चलन विनिमय दर | | |
| --- | --- | --- |
| युरो | डॉलर | पौंड |
| ९२.७२ | ८५.७५ | ११०.९९ |

# 'विदर्भातील सिंचन प्रकल्पांचा किती अनुशेष बाकी?'

**नागपूर :** विदर्भातील सिंचन प्रकल्पांचा किती अनुशेष बाकी आहे?, केंद्रीय अर्थसंकल्पात या प्रकल्पांसाठी किती निधी मिळाला?असे मौखिक प्रश्न उपस्थित करत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य सरकारला तीन आठवड्यात प्रतिज्ञापत्र सादर करण्याचो आदेश दिले.

लोकनायक बापूजी अणे स्मारक समितीतर्फे दाखल जनहित याचिकेवर नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती नितीन सांबरे आणि न्यायमूर्ती वृषाली जोशी यांच्या न्यायालयात सोमवारी सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांचे वकील अविनाश काळे यांच्यानुसार विदर्भाचा ५५ हजार कोटींचा अनुशेष बाकी आहे, असल्याचे म्हटले आहे. त्यावर सुनावणीवेळी न्यायमूर्तींनी ६५ टक्के सिंचन प्रकल्प अपूर्ण आणि अनुशेष बाकी असल्यामुळे राज्याच्या मुख्य सचिवांना तीन आठवड्यांत प्रतिज्ञापत्र सादर करावेत, असे आदेश न्यायमूर्तींनी दिले. मुख्य सचिवांनी जुलै २०२३ मध्ये प्रतिज्ञापत्र सादर केले होते. यानंतर उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यात आले नाही.

# अमेरिकेला आयात शुल्कात सवलत

## 'जशास तसा'' कर टाळण्यासाठी भारताचे पाऊल

**नवी दिल्ली :** अमेरिकेने जाहीर केलेली 'जशास तशी' कर आकारणी टाळण्यासाठी भारताने आयात शुल्कात कपात करण्याची तयारी दर्शविली आहे. पहिल्या टप्प्यात २३ अब्ज डॉलरच्या आयातीपैकी निम्म्याहून अधिक आयातीला शुल्क सवलत दिली जाण्याची तयारी भारताने दर्शविली आहे.

अमेरिकेचे मध्य आणि दक्षिण आशियाई देशातील सहायक व्यापार प्रतिनिधी ब्रेंडन लिंच यांच्या नेतृत्वाखालील अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ मंगळवारी पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहे. अमेरिकेने २ एप्रिलपासून भारतावर जशास तसा कर लागू करण्याचा इशारा दिला आहे, त्या पार्श्वभूमीवर अमेरिकन उच्चाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ भारत भेटीवर आले आहे. शुल्कवाढीमुळे भारतीय निर्यात मोठ्या प्रमाणावर विस्कळीत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे भारताने एक पाऊल मागे घेत शुल्ककपात करण्याची तयारी केली आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार भारताच्या एकूण निर्यातीच्या ८७ टक्के म्हणजेच ६६ अब्ज डॉलरची निर्यात शुल्कवाढीमुळे प्रभावित होऊ शकते. एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार जशास तसा कर लागू झाल्यास भारतातून अमेरिकेत जाणाऱ्या ११ अब्ज डॉलरच्या औषधांच्या व्यापारास फटका बसेल. त्याचा फायदा इंडोनेशिया, इस्रायल व व्हिएतनामला होईल. भारत हक्काची बाजरपेठ गमावण्याची भीती आहे. भारताने शुल्ककपात केल्यानंतर अमेरिकन वस्तूंवर असलेले ५५ टक्के शुल्क कमी होऊ शकते. अमेरिकन वस्तूंवरील करश्रेणी ५ ते ३० टक्क्यांवर येईल. काही वस्तूंवरील शुल्क संपूर्ण नाहीसे होईल. तर काही वस्तूंवरील शुल्कदर कमी होईल. त्याचा फायदा २३ अब्ज डॉलरच्या अमेरिकन वस्तूंना होईल.

### गुगल कर १ एप्रिलपासून हटणार

ऑनलाइन जाहिरात सेवेवर केंद्र सरकारने ६ टक्के शुल्क आकारणी केली आहे. या करामुळे गुगल आणि मेटा यांसारख्या कंपन्या जास्त प्रभावित झाल्या आहेत. त्यामुळे या शुल्काला गुगल कर असे संबोधण्यात आले होते. हे शुल्क येत्या १ एप्रिलपासून रद्द करण्याचा प्रस्ताव आहे. हा कर २०१६ मध्ये समानीकरण शुल्क म्हणून आणण्यात आला होता. हा कर रद्द झाल्याने डिजिटल व्यासपीठावर जाहिरात करणे स्वस्त होईल. तसेच, कंपन्यांच्या नफ्यातही वाढ होणार आहे.


प्रारूप अ

**जाहीर घोषणा**

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ(स्वेच्छा आवसायन प्रक्रिया) नियम, २०१७ च्या नियम १४ अंतर्गत)

**राठी टर्बोफ्लेक्स प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांनी लक्ष द्यावे**

| | | |
| --- | --- | --- |
| १ | कॉर्पोरेट व्यक्तीचे नाव | **राठी टर्बोफ्लेक्स प्रायव्हेट लिमिटेड** |
| २ | कॉर्पोरेट व्यक्तीच्या निगमनाचा दिनांक | २६/१२/२००२ |
| ३ | ज्या प्राधिकाराखाली कॉर्पोरेट व्यक्तीची निगमन/ नोंदणी झाली | कंपनी रजिस्ट्रार -पुणे |
| ४ | कॉर्पोरेट व्यक्तीचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक(सीआयएन)/ मर्यादित उत्तरदायित्व क्रमांक | U31200PN2002PTC017536 |
| ५ | कॉर्पोरेट व्यक्तीच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि मुख्य कार्यालयाचा (असल्यास) पत्ता | गैया ॲपेक्स, एस.आर. क्र ३३/१/१/२, प्लॉट-डी दुसरा मजला, विमान नगर, पुणे, महाराष्ट्र, भारत, ४११०१४ |
| ६ | कॉर्पोरेट व्यक्तीच्या अवसायन प्रारंभाचा दिनांक | **२५.०३.२०२५** |
| ७ | अवसायक यांचे नाव, पत्ता, ईमेल पत्ता, दूरध्वनी क्रमांक आणि नोंदणी क्रमांक | नाव : प्रमोद दत्ताराम रासम<br>नोंदणी क्र. : IBBI/IPA-001/IP-P00722/ 2017-18/11259<br>खोली क्र. ५, श्री निवास चाळ, जे बी नगर, अंधेरी-पूर्व मुंबई-४०००५९<br>दूरध्वनी : +९१ ९८२००२४७६३<br>ई-मेल : pdrasam@gmail.com |
| ८ | दावा सादर करण्याचा अंतिम दिनांक | **२४.०४.२०२५** |

इथे सूचना देण्यात येते की, **राठी टर्बोफ्लेक्स प्रायव्हेट लिमिटेड** यांनी स्वेच्छा अवसायन २५.०३.२०२५ रोजी सुरू केले. **राठी टर्बोफ्लेक्स प्रायव्हेट लिमिटेडच्या** भागधारकांना यांना इथे आवाहन करण्यात येते की त्यांनी त्यांच्या दाव्याचे पुरावे २४.०४.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी क्र.७ मध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर आवसायक यांच्याकडे सादर करावे.
फायनान्शियल क्रेडीटर्सनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारेच सादर करायचे आहेत. इतर सर्व भागधारकांनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे प्रत्यक्षपणे, पोस्टाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे सादर करावेत.
दाव्यांचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंडास पात्र ठरेल.

स्वाक्षरी/-
प्रमोद दत्ताराम रासम
**अवसायक**
**IBBI/IPA-001/IP-P00722/2017-18/11259**

दिनांक : २६ मार्च, २०२५
ठिकाण : पुणे